पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ
Punyashlok Ahilyadevi Holkar Solapur University
सोलापूर -पुणे राष्ट्रीय महामार्ग, केगांव, सोलापूर -४१३ २५५ (महाराष्ट्र)
Solapur-Pune National Highway, Kegaon, Solapur-413 255 (Maharashtra)
ईमेल : dbee@sus.ac.in ✆: ०२१७-२७४४७७०,७१,७२,७३,७४ फॅक्स : २३५१३०० संकेतस्थळ - http://su.digitaluniversity.ac www.sus.ac.in विस्तारीत क्रमांक : १३०
परीक्षा व मूल्यमापन मंडळ Board of Examinations and Evaluation

जावक क्र. : पुअहोसोवि/पवमूमं/
Ref. No. : PAHSU/BOEE/ 2358 दिनांक : Date : 19 OCT 2023

प्रति,

मा.संचालक/प्राचार्य/प्राचार्या,

प्रस्तुत विद्यापीठ संलग्नित सर्व महाविद्यालये व विद्यापीठ संकुले,

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर

**विषय -** Implementation of Academic Bank of Credits (ABC)

**संदर्भ -** 1) उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मुंबई यांनी दि.17/03/02023 रोजी आयोजित कार्यशाळेमध्ये केलेल्या सुचना व मार्गदर्शन.
2) जावक क्र. पुअहोसोवि/पवमूमं/3712 दि.28/12/2022 रोजीचे पत्र
3) जावक क्र. पुअहोसोवि/पवमूमं/3541 दि.03/12/2022 रोजीचे पत्र
4) जावक क्र. पुअहोसोवि/पवमूमं/3514 दि.25/11/2022 रोजीचे पत्र
5) जावक क्र. पुअहोसोवि/पवमूमं/3442 दि.15/11/2022 रोजीचे पत्र
6) जावक क्र. पुअहोसोवि/पवमूमं/3396 दि.07/11/2022 रोजीचे पत्र
7) जावक क्र. पुअहोसोवि/पवमूमं/3344 दि.21/10/2022 रोजीचे पत्र

महोदय,

उपरोक्त संदर्भ क्र. ३ ते ६ नुसार विद्यापीठाशी संलग्नित सर्व महाविद्यालये, विद्यापीठ संकुले यांना विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली यांनी सूचना दिल्या प्रमाणे ॲकडेमिक बॅक ऑफ क्रेडिट्स (ABC) या संदर्भात पूर्तता व कार्यवाही करुन दिलेल्या Format मध्ये विद्यार्थ्यांची माहिती भरुन ईमेलद्वारे विद्यापीठास पाठविण्याबाबत वेळोवेळी कळविण्यात आलेले होते. तसेच सर्व महाविद्यालयास व विद्यापीठ संकुल यांना फोनद्वारे संपर्क साधून माहिती पाठविण्याबाबत कळविण्यात आलेले होते.

दि.१४/११/२०२२ रोजी झालेल्या बैठकीतील विषय क्र. ५ वरती झालेल्या ठरावानुसार विद्यापीठ संलग्नित महाविद्यालय व विद्यापीठ संकूल यांनी सर्व सत्राच्या (प्रथम सत्र ते अंतिम वर्षाच्या) सर्व विद्याशाखा सर्व अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्याच्या प्रवेशाची प्रक्रिया करतेवेळी व परीक्षा फॉर्म भरतेवेळी ABC ID तयार करुन तो परीक्षा फॉर्मवर नमुद करणे अनिवार्य करण्यात आलेले होते. त्यानुसार सर्व महाविद्यालये व संकुले यांना अवगत करण्यात आलेले होते.

संदर्भ क्र. २ नुसार विद्यार्थ्यांकडे अद्यापपर्यंत ABC ID उपलब्ध नसल्याने महाविद्यालयांना प्रवेश प्रक्रियेवेळी व परीक्षा फॉर्म भरतेवेळी अडचणी निर्माण होत आहेत. त्यामुळे सदर अनिवार्य केलेली बाब परीक्षेच्या वेळी ऐच्छीक करण्यात आलेली होती.

तसेच संदर्भ क्र.१ नुसार Academic Bank of Credits (ABC) बाबत माहिती देण्यासाठी उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मुंबई यांनी मुंबई येथे एक दिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आलेले होते. सदर कार्यशाळेमध्ये दिलेल्या सुचनेनुसार प्रस्तुत विद्यापीठ संलग्नीत सर्व महाविद्यालय व विद्यापीठ संकुलातील सर्व विद्यार्थ्यांचे ABC ID जनरेट करणे अनिवार्य करण्यात आलेले आहे.

याअनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, ज्या आपल्या महाविद्यालयातील / संकुलातील ज्या विद्यार्थ्यांचे ABC ID अद्यापपर्यंत जनरेट केलेले नाहीत अशा विद्यार्थ्यांचे ABC ID तात्काळ जनरेट करण्याबाबतची योग्य ती कार्यवाही आपल्या स्तरावर करुन विद्यार्थ्यांचे ABC ID दिलेल्या Format मध्ये विद्यापीठाकडे पाठविण्याची व विद्यार्थ्यांच्या Profile मध्ये Update करण्याची कार्यवाही करावी. तसेच ABC ID शिवाय ऑक्टों. २०२३ या सत्राचे परीक्षा फॉर्म वेबसाईटवरती इनवर्ड (Inward) होणार नाहीत. त्यामुळे सर्व विद्यार्थ्यांकडून परीक्षा फॉर्म भरून घेण्यापूर्वी ABC ID तयार करुन तो परीक्षा फॉर्मवर नमुद करणे अनिवार्य आहे.

ABC ID उपलब्ध नसल्यास विद्यार्थ्यांच्या होणाऱ्या नुकसानीस आपण संबंधित जबाबदार राहाल. याची सर्वांनी नोंद घ्यावी. सदरचे परीपत्रक संबंधितांच्या निदर्शनास आणून देण्याची कार्यवाही महाविद्यालये / संकुला मार्फत करण्यात यावी.

कळावे

( डॉ. म. स. रोकडे )
प्र. संचालक
परीक्षा व मूल्यमापन मंडळ